नविन घटकांना / स्टार्टअप्स यांना माहिती तंत्रज्ञान उद्यानांकडून त्यांच्या एकूण बांधीव क्षेत्राच्या कमीत कमी २% क्षेत्र इनक्युबेशन सुविधेकरीता वाटप करणे संदर्भांतील कार्यपध्दती .

माहिती तंत्रज्ञान व माहिती तंत्रज्ञान सहाय्यभूत सेवा धोरण- २०१५

महाराष्ट्र शासन

उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग,

शासन निर्णय क्रमांक. आयआयटी-२०१६ /प्र.क्र. ७६/उद्योग-२

मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,

मंत्रालय, मुंबई - ३२.

दिनांक : १८ मे, २०१६

संदर्भ : १) शासन निर्णय क्र.आयटीपी-२०१३/(प्र.क्र. २६५)/उद्योग-२, दि.२५ ऑगस्ट, २०१५.

२) शासन निर्णय क्र. मातंधो-२०१५/(प्र.क्र. २०७)/उद्योग-२, दि. २२ फेब्रुवारी, २०१६.

प्रस्तावना :-

महाराष्ट्राचे माहिती तंत्रज्ञान व माहिती तंत्रज्ञान सहाय्यभूत सेवा धोरण-२०१५ मधील परि. ४.१ नुसार विविध शैक्षणिक संस्था व संशोधन संस्था आणि माहिती तंत्रज्ञान उद्योग, यांच्यात ज्ञान स्त्रोतांची देवाण घेवाण व प्रसार होण्यासाठी एक सामाईक व्यासपिठ उभारुन लहान उद्योगांकरीता "इन्क्युबेशन सेंटर"ची स्थापना करण्यास शासन मदत करणार आहे. याच उद्देशाचा एक भाग म्हणून "नवीन घटकांना सक्षम करण्यासाठी इनक्युबेशन सुविधा देण्याकरिता नवीन माहिती तंत्रज्ञान उद्यानांना त्यांच्या बांधीव क्षेत्राच्या कमीत कमी २ टक्के क्षेत्र वाटप करावे लागेल. उद्यानाचे हे क्षेत्र माहिती तंत्रज्ञानाच्या कार्याकरिता वापरावयाच्या क्षेत्राचा एक भाग म्हणून गणन्यात येईल व सदर अतिरिक्त चटईक्षेत्र निर्देशांकाचा लाभ मिळण्यास पात्र ठरेल."

शासन निर्णय :-

नविन घटकांना/स्टार्टअप्स यांना इनक्युबेशन सुविधा देण्याकरीता नवीन माहिती तंत्रज्ञान उद्यानांनी त्यांच्या बांधीव क्षेत्राच्या कमीत कमी २% क्षेत्राचे वाटप करणे संदर्भात भाडयाचे दर, पात्रता, अर्ज करण्याची पध्दती इत्यादी संदर्भात मार्गदर्शक तत्त्वे व कार्यपध्दती (मराठी व इंग्रजी) सोबतचे "विवरणपत्र-अ"मध्ये सविस्तर पणे दर्शविण्यात आली आहे. उक्त कार्यपध्दतीनुसार कार्यवाही करण्यास शासन याद्वारे मान्यता देत आहे.

२. सदर शासन निर्णय संदर्भांकित शासन निर्णय दिनांक २५/०८/२०१५ मधील तरतुदीनुसार शासन मान्यतेने निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या संकेत स्थळावर www.maharashtra.gov.in येथे उपलब्ध असून त्याचा संगणक संकेतांक २०१६०५१३१२११५०४६१० आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नांवाने.

Venkatesh Hanamantrao Kulkarni

Digitally signed by Venkatesh Hanamantrao Kulkarni
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Under Secretary, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=6c45807d6643737585e13204d4be0f3ed1b0f2e62806f55857f2a7ad678caa4d, cn=Venkatesh Hanamantrao Kulkarni
Date: 2016.06.06 13:11:27 +05'30'

(व्यं. ह. कुलकर्णी)
शासनाचे अवर सचिव

प्रति,

१. मा. मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
२. अपर मुख्य सचिव (वित्त), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
३. अपर मुख्य सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.
४. अपर मुख्य सचिव, माहिती तंत्रज्ञान, मंत्रालय, मुंबई.
५. अपर मुख्य सचिव (अत्यावश्यक सेवा विषयी), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई.
६. मा. मुख्यमंत्र्याचे प्रधान सचिव, मुख्यमंत्री सचिवालय, मुंबई.
७. प्रधान सचिव (महसूल) महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.
८. प्रधान सचिव (नवि-१) नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
९. प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.
१०.प्रधान सचिव (कामगार), उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई.
११. प्रधान सचिव, पर्यावरण विभाग, मंत्रालय, मुंबई.
१२. प्रधान सचिव (ऊर्जा), उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई.
१३.सचिव (नवि-२), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
१४.सचिव (मदतकार्य व पुर्नवसन) महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.
१५. सचिव, ग्रामविकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
१६. विकास आयुक्त (उद्योग), उद्योग संचालनालय, मंत्रालयासमोर, मुंबई.
१७. मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, अंधेरी (पूर्व), मुंबई.
१८. महानगरपालिका आयुक्त, महानगर पालिका (सर्व)
१९. संचालक, नगररचना व मूल्यनिर्धारण, पुणे,
२०. अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ, मुंबई.
२१. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र विद्युत वितरण कंपनी (महावितरण), प्रकाशगड, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०० ०५१

२२. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी (महापारेषण) प्रकाशगंगा, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०० ०५१.
२३. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य विद्युत निर्मीती (महानिर्मीती) प्रकाशगड, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०० ०५१.
२४. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य विकास अभिकरण, म्हाडा कमर्शिअल कॉम्पलेक्स, २ रा मजला, त्रिदल नगरच्या समोर, ऐरवडा, पुणे ४११ ००६.
२५. व्यवस्थापकीय संचालक, सिडको, मुंबई.
२६. विभागीय आयुक्त, पुणे/नाशिक/नागपूर/औरंगाबाद/अमरावती/मुंबई.
२७. जिल्हाधिकारी (सर्व)
२८. सर्व जिल्हयांचे सह संचालक (उद्योग संचालनालय)
२९. विरोधी पक्षनेते विधानसभा यांचे खाजगी सचिव, विधानमंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई.
३०. विरोधी पक्षनेते, विधानपरिषद, यांचे खाजगी सचिव, विधानमंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई.
३१. अध्यक्ष, विधानसभा यांचे खाजगी सचिव, विधानमंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई.
३२. सभापती, विधानपरिषद यांचे खाजगी सचिव, विधानमंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई.
३३. मा. मंत्री (उद्योग) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
३४. मा. राज्यमंत्री (उद्योग) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
३५. महानिरीक्षक, नोंदणी व नियंत्रक, मुद्रांक शुल्क, पुणे.
३६. निमंत्रक, उद्योग मित्र, मुंबई.
३७. उद्योग सह संचालक (माहिती तंत्रज्ञान), उद्योग संचालनालय, मुंबई.
३८. संचालक, सॉफ्टवेअर टेक्नॉलॉजी पार्क्स ऑफ इंडिया, मुंबई/पुणे.
३९. उप महानिरीक्षक, मुंद्रांक शुल्क, मुंबई.
४०. उद्योग विभागातील सर्व सहसचिव/उपसचिव/कक्ष अधिकारी.
४१. कक्ष अधिकारी (म-१), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.
४२. मुख्य सचिव यांचे वरिष्ठ स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई.
४३. प्रधान सचिव (उद्योग) यांचे वरीष्ठ स्वीय सहाय्यक, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई.
४४. उप सचिव (उद्योग-२) यांचे स्वीय सहाय्यक, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई.
४५. निवड नस्ती (उद्योग-२), उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई.

उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्रमांक-आयआयटी-२०१६/प्र.क्र.७६/ उद्योग-२, दिनांक १८ मे, २०१६

"विवरणपत्र -अ"

<u>उद्योजकता, संशोधन वृध्दी व माहिती तंत्रज्ञान इन्क्युबेशन सुविधा यास प्रोत्साहित करणे.</u>

<u>तरतुदी</u> : माहिती तंत्रज्ञान व माहिती तंत्रज्ञान सहाय्यभूत सेवा धोरण २०१५ अन्वये फायदे घेणारी सध्या अस्तित्वात असलेली पात्र मान्यतेप्राप्त माहिती तंत्रज्ञान उद्याने तसेच नवीन माहिती तंत्रज्ञान उद्याने यांनी त्यांच्या बांधकाम क्षेत्राच्या कमीत कमी २% इतके क्षेत्र नवीन घटकांना / स्टार्टअप्स यांना इन्क्युबेशन सुविधा पुरविण्यासाठी विभागून ठेवावा लागेल. सदरचे क्षेत्र हे माहिती तंत्रज्ञान उपक्रमांसाठीच्या उद्यानाचा भाग म्हणून मानले जाईल आणि अतिरिक्त चटईक्षेत्राचा फायदा घेण्यास पात्र असेल.

जे २% बांधकाम क्षेत्र २५०० चौरस फुट किंवा त्यापेक्षा जास्त असेल त्याचे वाटप या मार्गदर्शक तत्त्वांचा अवलंब करून करता येईल. जर असे क्षेत्र २५०० चौरस फुट पेक्षा कमी असेल तर ते क्षेत्र विकासकाकडून फक्त नवीन घटकांना / स्टार्टअप्स ना इन्क्युबेशन सुविधा पुरविण्यासाठी वाटप केल जाईल आणि सदर जागा इतर कोणत्याही उद्देशासाठी वाटप, वापर करता येणार नाही. खाली नमूद मार्गदर्शक तत्त्वांपैकी अनु. क्र. १ ते ५ आणि ७ व ८ हे विकासकाने जागेचे वाटप करण्यासाठी लागू होतात. परिशिष्ट -I येथे नमूद केलेल्या नमुन्यामध्ये विकासकाने दर सहा महिन्यांनी (दिनांक ३१ मार्च व ३० सप्टेंबर रोजी संपणाऱ्या) विकास आयुक्त (उद्योग) यांना अहवाल सादर करावा. तसेच मार्गदर्शक तत्त्व क्र. ६ येथे नमूद समितीकडून दर सहा महिन्यांनी वाटपाचा आढावा घेतला जाईल.

सुरुवातीच्या टप्प्यातील स्टार्टअप्स्, निधीचा पहिला हप्ता मिळेपर्यंतच्या कालावधीत टप्पा-१ इन्क्युबेशन सुविधा मिळविण्यास पात्र असतील. स्टार्टअप्स ना निधीचा पहिला हप्ता मिळाल्यानंतर ते टप्प्या-२ इन्क्युबेशन सुविधा मिळविण्यास पात्र ठरतील.

अ. क्र.	शीर्षक	स्पष्टीकरण
१.	**प्रयोज्यता-तरतुदी लागू होणे** (Applicability)	सर्व नवीन माहिती तंत्रज्ञान उद्याने तसेच यापूर्वीच मान्यता देण्यात आलेली आणि २०१५चे धोरण लागू करण्यास मान्यता देण्यात आलेली पात्र माहिती तंत्रज्ञान उद्याने, जी माहिती तंत्रज्ञान / माहिती तंत्रज्ञान सहाय्यभूत सेवा धोरण-२०१५ अन्वये दिल्या जाणाऱ्या खालील फायदयांचा लाभ घेत आहेत, त्यांना धोरणातील सदर तरतूद लागू असेल. (i) LOI ला (इरादापत्रास) de-novo मुदतवाढ मिळण्यासाठी मागणी करणाऱ्या सध्या अस्तित्वात असलेली माहिती तंत्रज्ञान उद्याने. (ii) २०१५ च्या धोरणाअंतर्गत अतिरिक्त चटईक्षेत्र मिळविण्यासाठी मागणी करणारी सध्या अस्तित्वात असलेली माहिती तंत्रज्ञान उद्याने.

अ. क्र.	शीर्षक	स्पष्टीकरण
२.	**भाडयाचे दर आणि देखभाल शुल्क** (Rental Rate and Maintenance)	भाडयाचे दर कमीत कमी असावेत, परंतु कोणत्याही परिस्थितीत सदर दर टप्पा -१ वरील स्टार्टअप्स साठी माहिती तंत्रज्ञान / माहिती तंत्रज्ञान सहाय्यभूत सेवा संबंधात उपक्रम राबविणाऱ्या सर्वात मोठया क्लायंटसाठी आकारल्या जाणाऱ्या भाडेदराच्या १०% पेक्षा आणि टप्पा -२ वरील स्टार्टअप्स साठी हा दर २५% पेक्षा अधिक असणार नाही. माहिती तंत्रज्ञान उद्यानांकडून स्टार्टअप्स ना त्यांच्या ऑपरेशन्सचा खर्च कमी राखणे सुलभ व्हावे म्हणून कोणता देखभाल खर्च आकारला जाणार नाही.
३	**माहिती तंत्रज्ञान उद्यानांच्या विकासकांनी पुरवावयाच्या पायाभूत सुविधा** (Infrastructure to be provided by IT Park Developers)	इन्क्युबेटर्स आणि ॲक्सेलेरेटर्स यांच्याकडून साधारणपणे पुरविण्यात येणाऱ्या 'रेडी टू ऑक्यूपाय' स्थितीत विकासकाकडून जागा पुरविण्यात येईल. सदरची जागा ही नेटवर्किंग (LAN Cabling, routers etc) आणि wi-fi, printers, बैठकांसाठीचे कक्ष, वाताकुलन संयंत्र, विद्युत प्रकाश यंत्रणा आणि उपकरणे या सर्व सुविधांनी सुसज्ज असावी म्हणजे स्टार्टअप्स ना सदर ठिकाणी त्वरीत ताबा घेऊन त्यांचे कार्य सुरु करता येईल. स्टार्टअप्सना वीजेचा आणि बँडविड्थ च्या वापरासाठी वास्तविक दराने किंवा प्रो-रेटाच्या आधारे आणि इतर उपभोग्य वस्तूंसाठी देयके द्यावी लागतील.
४	**जागेसाठी पात्रता** (Eligible for space)	या मार्गदर्शक तत्वांच्या आधारे खालील जागा मिळविणेस पात्र राहतील. १. टप्पा-१ स्टार्टअप्स २. टप्पा-२ स्टार्टअप्स स्टार्टअप्स त्यांच्या संपूर्ण कार्यकालामध्ये केवळ एकदा सवलतीची जागा घेण्यास पात्र राहतील. कोणत्याही परिस्थितीमध्ये एकादा जागा वाटप करण्यात आलेल्या स्टार्टअप्स च्या प्रवर्तकास कोणत्याही ठिकाणी पुन्हा जागा वाटप करता येणार नाही.
५	**अर्ज कसा करावा** (How to Apply)	खाली नमूद कंपन्या (उपक्रम) या मार्गदर्शक तत्वांच्या आधारे मोठया प्रमाणात जागा वाटप होण्यासाठी विकास आयुक्त (उद्योग), मुंबई यांचेकडे अर्ज करु शकतील. अशा कंपन्यांनी विकास आयुक्त (उद्योग) यांच्याशी करारनामा केल्यानंतर त्यांना पाच वर्षाकरीता जागा वाटप करण्यात येतील. या कंपन्या अ. क्र. ४ येथे नमूद करण्यात आलेल्या पात्र कंपन्यांना/ (उपक्रमांना) जागा वाटप करतील.

अ. क्र.	शीर्षक	स्पष्टीकरण
		जागा वाटपासाठी आणि स्टार्टअप्स मधून बाहेर पडण्यासाठी अ. क्र. ७ व ८ याठिकाणी नमूद करण्यात आलेली कार्यपध्दती चे काटेकोरपणे पालन करण्यात यावे. ते उपक्रम/ कंपन्या पुढीलप्रमाणे : १. नॅसकॉम, मुंबई. २. द इंडस इंटरप्रेन्यूअर्स (TiE), मुंबई आणि पुणे. ३. सोसायटी फॉर इनोव्हेशन अँड इंटरप्रेन्यूअर्सशिप (SINE) , आयआयटी मुंबई. ४. इंटरनॅशनल टॉप रेटेड इन्क्युबेटर्स/ ॲक्सलेरेटर्स-वाय-कॉम्बीनेटरी, स्टार्टअप ५००, ५. स्टार्टअप व्हिलेज. ६. इंटरनॅशनल टॉप रेटेड इन्क्युबेटर्स/ ॲक्सलेरेटर्स ७. इन्क्युबेटर्स फर्मस् ८. ॲक्सलेरेटॉर्स फर्मस्.
६	**मोठया प्रमाणातील जागेचे वाटप** (Allocation of Bulk Space)	विकास आयुक्त (उद्योग), महाराष्ट्र शासन यांच्या अध्यक्षतेखाली गठीत खालील सदस्यांचा समावेश असलेल्या समितीकडून परि. ५ येथे नमूद करण्यात आलेल्या कंपन्यांना/उपक्रमांना मोठया प्रमाणातील जागेचे वाटपाबाबत निर्णय घेईल. १. नॅसकॉमचे पुणे /मुंबई/ नागपूर येथील प्रादेशिक कार्यालयाचे प्रमुख २. TiE चे प्रमुख मुंबई/ पुणे ३. प्रोफेसर इन चार्ज, सोसायटी फॉर इनोव्हेशन अँड इंटरप्रेन्यूअर्सशिप (SINE) , आयआयटी मुंबई. ४. इन्क्युबेटर्स/ ॲक्सलेरेटर्स यांचा एक प्रतिनिधी. ५. एंजल इन्व्हेस्टर्स यांचा एक प्रतिनिधी. ६. यशस्वी झालेल्या स्टार्टअप्स चे एक किंवा दोन प्रतिनिधी. आणि ७. उद्योग सहसंचालक (माहिती तंत्रज्ञान), उद्योग संचालनालय, महाराष्ट्र शासन. **समितीचे कार्यक्षेत्र** : विकास आयुक्त (उद्योग), महाराष्ट्र शासन, द इंडस इंटरप्रेन्यूअर्स (TiE), नॅसकॉम आणि प्रोफेसर इन चार्ज, सोसायटी फॉर इनोव्हेशन अँड इंटरप्रेन्यूअर्सशिप (SINE) , आयआयटी मुंबई हे एकत्रितरित्या ४ ते ६ याठिकाणी नमूद केलेल्या सदस्यांची निवड करतील. मोठया प्रमाणात जागेसाठी विनंती करणाऱ्यांची निवड व सनियंत्रण सदर समिती करेल.

अ. क्र.	शीर्षक	स्पष्टीकरण
		परि. ५ येथे नमूद करण्यात आलेल्या इंटरनॅशनल टॉप रेटेड इन्क्युबेटर्स/ ॲक्सलेरेटर्स यांची पात्रता समिती ठरवेल. सदर समितीची तीन महिन्यातून कमीत कमी एकदा किंवा मोठया प्रमाणात जागेची मागणी विचारात घेऊन त्या पेक्षा अधिक वेळा बैठक आयोजित करण्यात येईल. परि. ५ मध्ये नमूद केलेल्या उपक्रम/ कंपन्यांकडून उद्योग घटकांना करण्यात आलेल्या आणि खाजगी माहिती तंत्रज्ञान उद्यानांकडून २५०० चौ. फूट पर्यंत करण्यात आलेल्या जागेच्या वाटपा चा आढावा सदर समिती प्रत्येक तीन महिन्यातून एकदा घेईल.
७	**स्टार्टअप घटकांसाठी जागेची निवड व वाटप** (Selection and allotment of space to startup units)	स्टार्टअप्स घटकांची निवड व जागेचे वाटप परि. ४ येथे नमूद केल्याप्रमाणे राहिल. २५०० चौ. फूटापेक्षा मोठया जागेसंदर्भात, Selected bulk space purchaser कडून आणि २५०० चौ. फूटापर्यंत जागेसंदर्भात संबंधित खाजगी माहिती तंत्रज्ञान उद्यानाच्या विकासकाकडून जागेची निवड व वाटप करण्यात येईल आणि विकासक व Selected bulk space purchaser सदर जागेच्या वाटपासंदर्भात विहित केलेल्या परिशिष्ट -१ मधील नमुन्यात विकास आयुक्त (उद्योग) यांना त्रैमासिक अहवाल सादर करतील.
८	**स्टार्टमधून बाहेर पडणे** (Exit of Startup)	टप्पा-१ चे इन्क्युबेशन स्टार्टअप्स यांना इन्क्युबेशन सुविधा प्राप्त झाल्यापासून ९ महिन्यांनी बाहेर पडावे लागेल परंतू मोठया प्रमाणात जागा धारण करणारे (परि. ५ येथे नमूद केलेले) त्यांना पुढील तीन महिन्यांसाठी मुदतवाढ देवू शकतात. त्याचप्रमाणे टप्पा-२ चे इन्क्युबेशन स्टार्टअप्स यांना इन्क्युबेशन सुविधा प्राप्त झाल्यापासून ९ महिन्यांनी बाहेर पडावे लागेल परंतू मोठया प्रमाणात जागा धारण करणारे (परि. ५ येथे नमूद केलेले) त्यांना पुढील तीन महिन्यांसाठी मुदतवाढ देवू शकतात. एकत्रितपणे (टप्पा-१ व टप्पा-२) स्टार्टअप सदरची जागा ताब्यात ठेवण्याचा कालावधी कमाल दोन वर्षांपेक्षा अधिक काळ असणार नाही.
९	**सनियंत्रण** (Monitoring)	१. अ. क्र. ५ येथे नमूद मोठया प्रमाणात जागेचे वाटप करण्यात आलेले उपक्रम जागेच्या वाटपाबाबत आणि त्यांना वाटप करण्यात आलेल्या जमिनीच्या वापराबाबतचा त्रैमासिक अहवाल विहित केलेल्या नमुन्यात विकास आयुक्त (उद्योग) यांना सादर करतील. मोठया प्रमाणातील जागेच्या धारक व विकासकांनी भरावयाचे सविस्तर विवरणपत्र (परिशिष्ट-१)

<table>
<tr><th>अ. क्र.</th><th>शीर्षक</th><th>स्पष्टीकरण</th></tr>
<tr><td></td><td></td><td>साठीचे वेबपोर्टल विकास आयुक्त (उद्योग) हे विकसित करतील.
२. अ. क्र. ५ येथे नमूद उपक्रम ज्यांना मोठया प्रमाणात जागेचे वाटप करण्यात आलेले आहे ते जागेच्या वाटपाबाबत आणि त्यांना वाटप करण्यात आलेल्या जमिनीच्या वापराबाबत वार्षिक सादरीकरण प्रधान सचिव (उद्योग) अध्यक्षतेखालील समितीसमोर करतील. सदर समितीची रचना पुढीलप्रमाणे असेल.
<table>
<tr><td>१</td><td>प्रधान सचिव, नगर विकास विभाग</td><td>सदस्य</td></tr>
<tr><td>२</td><td>प्रधान सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग</td><td>सदस्य</td></tr>
<tr><td>३</td><td>सचिव, कौशल्य विकास व उद्योगजकता विकास विभाग</td><td>सदस्य</td></tr>
<tr><td>४</td><td>मुख्य कार्यकारी अधिकारी, MIDC</td><td>सदस्य</td></tr>
<tr><td>५</td><td>विकास आयुक्त (उद्योग)</td><td>सदस्य</td></tr>
<tr><td>६</td><td>उद्योग सह संचालक (माहिती तंत्रज्ञान)
उद्योग संचालनालय</td><td>सदस्य सचिव</td></tr>
</table>
</td></tr>
</table>

Industries] Energy & Labour Department Government Resolution No IIT-2016 / CR-76/ Ind-2, Dated 18th May, 2016

"Annexure -A"

Promotion of Entrepreneurship, Innovation and IT Incubation Facility

<u>Provision</u>: New IT Parks and existing IT Parks availing benefits under the IT/ITES Policy 2015 will be required to allocate at least 2% of the built-up area for providing incubation facilities for new units / Startups. This area would be treated as a part of the Park to be used for IT activities and eligible for additional FSI benefit accordingly.

2% of the built-up area which is more than or equal to 2500 sq. feet will be allotted by adopting these guidelines. If the area is less than 2500 sq. feet, it will be allotted by the developer only for providing incubation facilities for new units / Startups and this space will not be allotted, used for any other purpose. Sr. No. 1 to 5 and 7 and 8 in the guidelines below will be applicable for allotting the spaces by the developer. The developer shall submit a report every six months (ending 31st March and 30th September) to the Development Commissioner (Industries) in format as in Annexure - I. Also, the Committee at Guidelines No. 6 will review every six months the allotment .

The early stage start-ups and until they get first round of funding will be eligible for **Stage-I Incubation** facilities. Once the start-ups get first round of funding, they will be eligible for **Stage-II Incubation** facilities.

<u>Guidelines</u>:

Sr. No.	Heading	Explanation
1.	**Applicability**	This provision of the policy will be applicable to all new IT Parks as well as those IT Parks, which approved earlier avail the following benefits under IT/ITES Policy-2015: (i) Existing IT Parks seeking de-novo extension to LOI; (ii) Existing IT Parks seeking additional FSI under the 2015 Policy
2.	**Rental Rate and Maintenance Charges**	Rental rate should be minimum, but under no condition more than 10% of the rental rate charged to the biggest client for IT/ITES activity in the Park for the Stage-I start-ups, and 25% of this rate for Stage-II start-ups. IT Park will not charge any maintenance charges as the startups have to maintain low cost of their operations.
3.	**Infrastructure to be provided by IT Park Developers**	The Park Developer will provide space in a ready-to-occupy condition as is generally provided by the Incubators and Accelerators. It should be furnished space with infrastructure like networking (LAN

Sr. No.	Heading	Explanation
		cabling, routers, etc.) and wi-fi, printers, meeting rooms, air-conditioning electrical lightning and fittings so that startups can move in quickly and start their operation. Startups will pay for consumption of power and bandwidth on actuals or on pro-rata basis and other consumables, etc.
4.	**Eligible for space**	Following will be eligible to get space under these guidelines: 1. Stage-I startups 2. Stage-II startups A Startup will be eligible for occupying the concessional space only once in its lifetime. Under no circumstances startup promoted by the same promoter(s) shall be allotted space more than once anywhere.
5.	**How to Apply**	Following entities will be able to apply for space in bulk under these guidelines to Directorate of Industries, Mumbai. Space will be allotted to these entities for a period of 5 years after they execute an agreement with the Directorate of Industries. These entities will allot space to entities eligible for space as given at Sr. No. 4 above. For allotment of space and exit of start-up procedure at Sr. No. 7 & 8 below shall be strictly adhered to. The entities are: 1. NASSCOM, Mumbai 2. The Indus Entrepreneurs (TiE), Mumbai and Pune 3. Society for Innovation & Entrepreneurship (SINE), IIT Mumbai 4. International top-rated incubators / accelerators - Y - combinatory, Startup 500 5. Startup Village 6. International top-rated incubators / accelerators 7. Incubator firms and 8. Accelerators firms
6	**Allocation of Bulk Space**	Allocation of bulk space to entities in para 5 above will be decided by a committee under the chairmanship of the Development Commissioner (Industries), GoM comprising of following members: 1. Regional head of NASSCOM, Pune/ Mumbai/Nagpur 2. Head of TiE, Mumbai / Pune

Sr. No.	Heading	Explanation
		3. Professor-in-Charge, Society for Innovation & Entrepreneurship (SINE), IIT, Mumbai 4. One member from accelerator/incubator. 5. One member from Angel Investors. 6. One or Two members from successful startups; and 7. Joint Director of Industries (IT) from Directorate of Industries, Govt. of Maharashtra The Development Commissioner (Industries), GoM, TiE, NASSCOM and Professor-in-Charge of SINE, IIT Mumbai will together decide about the members mentioned at point No. 4 to 6. The Committee will select and monitor bulk space requesters. The Committee shall decide the eligibility of International top-rated incubators / accelerators as at & in para 5 above. The Committee shall meet at least once in 3 months or more frequently if required keeping in view the demand for bulk space. The Committee shall also review the allocation of space to units by the entities in para 5 and the developers of private IT parks for spaces up to 2500 sq. ft. every three months.
7	**Selection and allotment of space to startup units**	Selection and allotment of space to startup units as defined in para 4 will be done by the selected bulk space purchaser for spaces more than 2500 sq. ft. and by the developer of the concerned private IT Park for spaces up to 2500 sq. ft. and they will submit a quarterly report on the space allotment in prescribed as in Annexure - 1 to the Development Commissioner (Industries).
8	**Exit of Startup**	Stage-I incubating startups will have to exit after 9 months from the incubation facility but the bulk space holder (as in para 5 above) can give a further extension of 3 months. Stage-II incubating startups will similarly exit after a period of 9 months, but the bulk space holder (as in para 5 above) can give a further extension of 3 months. Together the upper limit for which the Start-up can occupy the space (Stage-I and Stage-II) will not be more than 2 years.
9	**Monitoring**	1. The entities at Sr. No. 5 to whom space has been allotted in bulk shall submit a quarterly report in prescribed format about the allotment and use of the space allotted to them to the Directorate of Industries.

<table>
<tr><th>Sr. No.</th><th>Heading</th><th>Explanation</th></tr>
<tr><td></td><td></td><td>Directorate of Industries will develop a web partial where bulk holders and developers will fill the detail of startup Annexure-1

2. The entities at Sr. No. 5 to whom space has been allotted in bulk shall make a presentation annually on the allotment and use of the space allotted to them to the Committee headed by the Principal Secretary (Industries) which shall comprise of :
<table>
<tr><td>1</td><td>Principal Secretary, Urban Development Department</td><td>Member</td></tr>
<tr><td>2</td><td>Principal Secretary, Higher & Technical Education Department</td><td>Member</td></tr>
<tr><td>3</td><td>Secretary, Skill Development Department</td><td>Member</td></tr>
<tr><td>4</td><td>Chief Executive Officer, MIDC</td><td>Member</td></tr>
<tr><td>5</td><td>Development Commissioner (Industries)</td><td>Member</td></tr>
<tr><td>6</td><td>Joint Director of Industries (IT), Directorate of Industries</td><td>Member Secretary</td></tr>
</table>
</td></tr>
</table>

ANNEXURE-1

1. Name of the Private IT Park
2. Location / Postal address of the Private IT Park
3. Details of Registration of Private IT Park
4. Total Built-up Area of the Park in Sq. M.
5. Built-up Area for incubation facilities (2% of total BUA) in Sq. M.
6. Total Built-up Area allotted for incubation / Start up units
7. No. of incubation / Start up units occupying the space
8. List of name, activity, area occupied, date of occupation of incubation / Start up units